# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २५.०४.२०१२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक २५.०४.२०१२ रोजी मा.पीठासीन अधिकारी श्री.कुणाल कुमार भा.प्र.से., जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची विशेष सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी १०.०० वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सदस्य उपस्थित होते.

१. श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत
२. श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
३. श्री.राजू रामराव शिंदे
४. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
५. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
६. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
७. श्री.खान आगा मिया खान
८. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
९. श्रीमती साधना गणेश सुरडकर
१०. श्री.खान अक्रम करीम खान
११. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
१२. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
१३. श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
१४. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
१५. श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
१६. श्री.भुईगळ अमित सुधाकर

**विषय क्र.१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती , आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० अन्वये स्थायी समिती सभापती पदावर निवड करणे.

नगर सचिव : सभापती,स्थायी समिती निवडी संबंधी ठळक कार्यपध्दती

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० चे नियम २ (२) चे तरतूदीप्रमाणे नगर सचिव यांनी मा.विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांचेशी विचार विनिमय केल्यानंतर स्थायी समितीचे सभापती पदाची निवडणूक घेण्यासाठी स्थायी समिती विशेष सभेची दिनांक २५/०४/२०१२ वेळ सकाळी १०.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

नियम क्र.४ अन्वये या विषेश बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त किंवा त्यांचा प्रतिनिधी असेल, जो अतिरिक्त आयुक्तांच्या कमी दर्जाचा नसावा, अशी तरतूद आहे. त्यानुसार मा.विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांनी त्यांचे आदेश जा.क्र.२०१२/साप्र/कक्ष-४/नपाप्र/आस्था/कावि-३०४, दिनांक १०.०४.२०१२ अन्वये स्थायी समितीच्या विशेष सभेचे सभाध्यक्ष/पीठासीन अधिकारी म्हणून काम करण्यास मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना प्राधिकृत केले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती, आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० अन्वये स्थायी समिती सभापती पदासाठी निवड करण्याकरीता दिनांक १३/०४/२०१२ रोजी स्थायी समिती विशेष बैठकीची सूचना निर्गमित करण्यात आली आहे. तसेच निवडणूक घेणे संदर्भात परिपत्रक क्रमांक मनपा/नस/२०१२/२६३, दिनांक १३.०४.२०१२ निर्गमित करण्यात आले आहे. व त्यासोबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती, आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० ची प्रत तसेच सर्व समित्यांचे सदस्यांची यादी देखिल समिती सदस्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक २३/०४/२०१२ ते २४.०४.२०१२ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व दिनांक २४.०४.२०१२ रोजी नामनिर्देशनपत्र स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक २४/०४/२०१२ रोजी कार्यालयीन वेळेत स्थायी समिती सभापती पदासाठी खालीलप्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत.

१. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
२. स.स.श्री. शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

* (नगर सचिव हे स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र छाननीसाठी पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करतात.)

पिठासीन अधिकारी: मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० चे नियम क्र.५ (२) अन्वये सभापती स्थायी समिती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येत आहे.

● (पीठासीन अधिकारी नगर सचिव यांच्या मदतीने छाननी करतात)

स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचे काम पूर्ण झाले असून खालीलप्रमाणे नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहे.

१. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
२. स.स.श्री. शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

पिठासीन अधिकारी: छाननीत वैध ठरलेल्या नामनिर्देशनातून उमेदवारास नामनिर्देशनपत्र/उमेदवारी परत घ्यावयाचे असल्यास त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती, आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१०चे नियम क्र.५ (३) अन्वये १५

मिनिटांच्या आत उमेदवाराने सही केलेली लेखी सूचना पीठासीन अधिकारी यांना देवून त्यांना आपली उमेदवारी मागे घेता येईल. आता सभागृहातील घड्याळाप्रमाणे १०.१५ वाजले असून १०.३० वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. तसेच नियम क्र.५ (४) अन्वये उमेदवारी मागे घेण्याची नोटीस दिल्यानंतर ती नोटीस रद्द करता येणार नाही.

पीठासीन अधिकारी :आता सभागृहातील घड्याळाप्रमाणे १०.३० वाजले असून स्थायी समिती सभापती पदासाठी ०२ उमेदवारापैकी विहित मुदतीत कोणत्याही उमेदवारांनी आपले नामनिर्देशन/उमेदवारी अर्ज परत घेतले नाहीत.स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नांवे मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती, आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१०चे नियम क्र.६ (२) नुसार प्राप्त नामनिर्देशनावरील नावांच्या मराठी वर्णानुक्रमाने लावण्यात आली असून ती खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव |
|---|---|
| १. | स.स.श्री. शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद |
| २. | स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल |

पीठासीन अधिकारी: मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती पदाच्या निवडणूका घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१०चे नियम क्र.६ (३) प्रमाणे हात वर करून मतांची नोंद घेण्यात येईल. नगर सचिव यांनी मतदान प्रक्रीया संबंधीची माहिती सभागृहास द्यावी.

नगर सचिव : सभापती,स्थायी समिती निवडी संबंधी कार्यपध्दती

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० चे तरतुदी अन्वये सभापती, पदाच्या मतदान प्रक्रीया व निवडी संबंधी तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

०१. नियम ६ (१) अन्वये एकच वैध नामनिर्देशन करण्यात आले असेल तर पिठासीन अधिकारी अशा उमेदवाराची रितसर निवड झाल्याचे घोषित करेल.

०२. नियम ६ (२) अन्वये जर वैध नामनिर्देशित उमेदवारांची संख्या एकापेक्षा अधिक असेल, तर पीठासीन अधिकारी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नांवे मराठी वर्णानुक्रमे लावतील.

०३. नियम क्र.६ (३) अन्वये उमेदवारांचे नांव वर्णानुक्रमाने पुकारण्यात येईल. ज्यांचे नांव पुकारण्यात येईल,त्यांचेसाठी प्रथम हात वर करून मतदान घेण्यात येईल व त्यांना मिळालेल्या मतांची नोंद घेण्यात येईल व त्यांनी ज्या उमेदवाराच्या बाजुने मत दिले आहे, अशा स्थायी समिती सदस्यांचे नांवाची नोंद कार्यवृत्तांतात नोंदविण्यात येईल.

०४. नियम क्र.६ (४) (एक) अन्वये मत देण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक सदस्यास आपले मत देण्यासाठी रास्त व वाजवी संधी मा.पिठासीन अधिकारी देतील.

०५. नियम क्र.६ (४) (दोन) अन्वये ज्यांचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे, अशा सदस्यास पुन्हा मत देण्याची किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही.

०६. नियम क्र.६ (५) अन्वये ज्या सदस्यांनी मतदान केलेले नाही, त्यांची नोंद देखिल कार्यवृत्तांतात घेण्यात येईल.

०७. नियम ६ (७) अन्वये निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या पीठासीन अधिकारी घोषित करतील व ज्या उमेदवाराला मतदानात जास्त मते पडतील, तो उमेदवार रितसर निवडुन आल्याचे पीठासीन अधिकारी घोषित करतील.

०८. नियम क्र. ६ (८) अन्वये मते समसमान मिळाल्यास पीठासीन अधिकारी असे घोषित करील की, निवडणुकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून सोडतीद्वारे ठरविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले स्थायी समिती सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठ्ठी काढण्यात येईल.

०९. नियम क्र. ६ (९) अन्वये ज्या उमेदवाराच्या नांवाची चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रीतीने निवडून आला असल्याचे पिठासीन अधिकारी घोषित करतील.

पीठासीन अधिकारी : आता वर्णानुक्रमाने उमेदवारांचे नांव घोषित करण्यात येत आहेत.

१) श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

यांना सभापती,स्थायी समिती पदासाठी ज्यांना मते द्यावयाची आहेत, त्यांनी आपले हात वर करून मत नोंदवावे मतगणना अधिकारी यांनी कृपया ज्यांनी ज्यांनी श्री. शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद यांना हात वर करून मतदान करित आहे, त्यांची नांवे लिहून घ्यावी व आपले स्वाक्षरीसह ती यादी माझेकडे सादर करावी. तसेच मतदान नोंदवितांना मतगणना अधिकारी यांनी मतदारांचे व्हिडीओ चित्रीकरण होईल,याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | स.स.श्री. शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद यांना हात वर करून मतदान करणाऱ्या स.सदस्यांची नांवे |
|---|---|
| १. | श्री.खान अक्रम करीम खान |
| २. | श्री. शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद |
| ३. | श्री. जाधव विजेंद्र मुरलीधर |
| ४. | श्री. बाळुलाल वरदाजी गुजर |
| ५. | श्री. जुबेर गाझी असीर अहमद |
| ६. | श्री. नासेरखान अब्दुल रहेमानखान |
| ७. | श्री.भुईगळ अमित सुधाकर |

पीठासीन अधिकारी :आता वर्णानुक्रमाने उमेदवारांचे नांव घोषित करण्यात येत आहेत.

२) श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल यांना सभापती,स्थायी समिती पदासाठी ज्यांना मते द्यावयाची आहेत, त्यांनी आपले हात वर करून मत नोंदवावे मतगणना अधिकारी यांनी कृपया ज्यांनी ज्यांनी स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल यांना हात वर करून मतदान करित आहे, त्यांची नांवे लिहून

घ्यावी व आपले स्वाक्षरीसह ती यादी माझेकडे सादर करावी. तसेच मतदान नोंदवितांना मतगणना अधिकारी यांनी मतदारांचे व्हिडीओ चित्रीकरण होईल,याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल यांना हात वर करून मतदान करणाऱ्या स.सदस्यांची नांवे |
|---|---|
| १. | श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत |
| २. | श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव |
| ३. | श्री.राजू रामराव शिंदे |
| ४. | श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द |
| ५. | श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर |
| ६. | श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल |
| ७. | श्री.खान आगा मिया खान |
| ८. | श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये |
| ९. | श्रीमती साधना गणेश सुरडकर |

एकूण हजर असलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या १६
मतदानात भाग घेतलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या १६
मतदानात भाग न घेतलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या ००
उमेदवारांना मिळालेली मते (मतांच्या संख्येनुसर चढत्या क्रमांकाने उमेदवारांची यादी)
०१. श्री. शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद (०७)
०२. श्री. सिध्द जगदिश कन्हैय्यालाल - (०९)

वरीलप्रमाणे झालेल्या मतदानात स्थायी समिती सभापती पदासाठी श्री. सिध्द जगदिश कन्हैय्यालाल यांना सर्वात जास्त मते मिळालेली आहेत. त्यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० अन्वये वैध रितीने निवड झाल्याचे याद्वारे घोषित करण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या मतदानानुसार श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल यांना सर्वात जास्त मते मिळालेली आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ (सुधारणा) नियम २०१० अन्वये श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल यांची स्थायी समिती सभापती पदावर बहुमताने झालेल्या निवडीस मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच या विशेष बैठकीचे कामकाज संपल्याचे मा. पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद